॥श्रीहरिः॥

# ॥ श्रीमद्भगवद्गीता - शुद्ध उच्चारण मार्गदर्शिका ॥

**(ही मार्गदर्शिका प्राथमिक स्तरावर भगवद्गीता प्रशिक्षणार्थिंसाठी तयार केली आहे)**

## ह्रस्व आणि दीर्घ उच्चारणाचे नियम -

- **ह्रस्व** : **अ, इ, उ, ऋ, लृ** ह्यापासून बनलेल्या अक्षरांचे उच्चार ह्रस्व (१ मात्रा) करावे, दीर्घ नाही.
- **दीर्घ** : **आ, ई, ऊ, ॠ, ए, ऐ, ओ, औ** ह्या अक्षरांपासून बनलेल्या अक्षरांचे उच्चार दीर्घ (२ मात्रा) असावे, ह्रस्व नाही.

## अनुस्वार उच्चारणाचे नियम -

- **अनुस्वार**- असा वर्ण जो स्वराच्या नंतर येतो आणि ज्याचा उच्चार नासिकेद्वारा केला जातो त्याला अनुस्वार म्हणतात.
- **अनुनासिक**- असा वर्ण ज्याचा उच्चार मुख आणि नासिका यांद्वारे केला जातो त्याला अनुनासिक असे म्हणतात.
- अनुस्वाराचे उच्चारण त्यापुढे येणाऱ्या वर्णावर अवलम्बून असते, म्हणजेच तो अनुस्वार पुढील वर्णानुसार परिवर्तित होतो.

### क वर्ग

- **क्, ख्, ग्, घ्, ङ्** हे **कण्ठ्य वर्ण** आहेत, ह्यांचा उच्चार कंठातून होतो.
- ह्या वर्गाचा अनुनासिक वर्ण **'ङ्'** आहे म्हणून ह्या वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'ङ्' असे करावे. उदा. - **कंकण (कङ्कण), पंख (पङ्ख), गंगा (गङ्गा), संघ (सङ्घ)**
- **'क्ष'** संयुक्त वर्ण आहे **(क्+ष=क्ष)** ह्यात **'क'** प्रथम वर्ण आहे म्हणून **'क्ष'** अक्षराच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण **'ङ्'** असे करावे. उदा. - **संक्षिप्त (सङ्क्षिप्त)**

## च वर्ग

- **च्, छ्, ज्, झ्, ञ्** हे **तालव्य वर्ण** आहेत ह्यांचा उच्चार टाळू पासून होतो.
- ह्या वर्गाचा अनुनासिक वर्ण **'ञ्'** आहे म्हणून ह्या वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'ञ्' असे करावे. उदा. - **चंचल (चञ्चल), पंछी (पञ्छी), पंजा (पञ्जा), रांझा (राञ्झा)**
- 'ज्ञ' संयुक्त वर्ण आहे (ज्+ञ=ज्ञ) ज्या मध्ये 'ज' पहिला वर्ण आहे अतः 'ज्ञ' च्या पूर्वी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'ञ्' असे होईल. उदा. इदंज्ञानम् (इदञ्ज्ञानम्)

## ट वर्ग

- **ट्, ठ्, ड्, ढ्, ण्** हे **मूर्धन्य वर्ण** आहेत ह्यांचा उच्चार मूर्धेपासून होतो.
- ह्या वर्गाचा अनुनासिक वर्ण **'ण्'** आहे म्हणून ह्या वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'ण्' असे करावे. उदा. - **घंटा (घण्टा), कंठ (कण्ठ), पंडित (पण्डित), षंढ (षण्ढ)**

## त वर्ग

- **त्, थ्, द्, ध्, न्** हे **दन्त्य वर्ण** आहेत. ह्यांचा उच्चार दातांपासून होतो.
- ह्या वर्गाचा अनुनासिक वर्ण **'न्'** आहे, म्हणून ह्या वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'न्' असे करावे. उदा. - **पंत (पन्त), पंथ (पन्थ), कंद (कन्द), अंध (अन्ध)**
- **'त्र'** संयुक्त वर्ण आहे **(त्+र=त्र)**, ज्यात **'त्'** हा प्रथम वर्ण आहे, तर तत्पूर्वी आलेल्या अनुस्वाराचे उच्चारण **'न्'** असे करावे. उदा. - **तंत्र (तन्त्र)**

## प वर्ग

- **प्, फ्, ब्, भ्, म्** हे **ओष्ठ्य वर्ण** आहेत. ह्यांचा उच्चार ओष्ठापासून होतो.
- ह्या वर्गाचा अनुनासिक वर्ण **'म्'** आहे, म्हणून ह्या वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण 'म्' असे करावे. उदा. - **चंपा (चम्पा), इंफाल (इम्फाल), संबल (सम्बल), दंभ (दम्भ)**

## विशिष्ट वर्ग

**'क'** ते **'प'** वर्गाच्या वर्णांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराच्या उच्चारांबद्दल आपण पाहिले, आता **'य्'** पासून ते **'ह्'** पर्यंत येणाऱ्या प्रत्येक वर्णाच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण कसे करायचे ते पाहुया.

उच्चारण स्पष्ट समजावे म्हणून कोष्टकात ते अक्षर लिहिले आहे. लक्षात ठेवा की हे वर्ण प्रत्यक्षात तेथे नाहीत, फक्त अनुस्वाराच्या उच्चारणाची स्पष्टता आणि प्राथमिक स्तराच्या विद्यार्थ्यांना सोयीचे जावे म्हणून निर्देशित केले आहेत.

### पदाच्या मध्ये अनुस्वारयुक्त वर्णानंतर येणारे 'य' ते 'ह' पर्यंत चे उदाहरण-

पदाच्या मध्ये येणाऱ्या **'य'** ते **'ह'** पर्यंत अक्षरांच्या आधी येणाऱ्या अनुस्वाराचे उच्चारण सानुनासिक **'यँ्', 'लँ्'** किंवा **'वँ्'** असे होते.

- **य** - संयम [सं(यँ्)यम], संयोगिता [सं(यँ्)योगिता], संयुक्त [सं(यँ्)युक्त]
- **ल** - संलग्न [सं(लँ्)लग्न], संलाप [सं(लँ्)लाप]
- **व** - संवाद [सं(वँ्)वाद], संवर्धन [सं(वँ्)वर्धन], संवेदना [सं(वँ्)वेदना]
- **र** - संरचना [सं(वँ्)रचना], संरक्षण [सं(व्)रक्षण], संरेखण [सं(वँ्)रेखण]
- **श/ष** - संशय [सं(वँ्)शय], वंश [वं(वँ्)श] , दंश [दं(वँ्)श], दंष्ट्रा [दं(वँ्)ष्ट्रा], संश्रय [सं(वँ्)श्रय]
- **स** - कंस [कं(वँ्)स], संसार [सं(वँ्)सार], संसर्ग [सं(वँ्)सर्ग]
- **ह** - सिंह [सिं(वँ्)ह], संहार [सं(वँ्)हार], संहिता [सं(वँ्)हिता]

### अनुस्वारांत पदांच्या पुढे येणाऱ्या 'य' ते 'ह' पर्यंतच्या वर्णांची उदाहरणे -

अनुस्वारांत वर्णापुढे **'य'** ते **'ह'** मधील कुठलाही वर्ण आल्यास तिथे अनुस्वाराचा उच्चार खालीलप्रमाणे होतो.

- **य** - धर्म्यामृतमिदं(यँ्) यथोक्तम्
- **र** - लोकमिमं(म्) रवि:
- **ल** – तदोत्तमविदां(लँ्) लोकान्
- **व** - ध्यानं(वँ्) विशिष्यते
- **श/ष** - इदं(म्) शरीरम्
- **स** - एवं(म्) सतत
- **ह** - क्षयं(म्) हिंसाम्

# विसर्ग उच्चारणाचे नियम -

## नियम १ : पदाच्या शेवटी येणाऱ्या विसर्गाचे उच्चारण

विसर्ग नेहमी स्वरानंतरच येतो. भगवद्गीतेमध्ये पंक्तीच्या शेवटी येणाऱ्या विसर्गाचे उच्चारण **'ह्'** सारखे केले जाते. स्वरांनुसार ते विसर्ग **ह, हु, हे,हि, हो** मध्ये परिवर्तित होतात.

### विसर्गाच्या मागील स्वर -

- **'अ'** असल्यास त्याचे उच्चारण **'ह/हा'** असे होईल. उदा. - **संशयः - संशयह/संशयहा**
- **'आ'** असल्यास त्याचे उच्चारण **'हा'** असे होईल. उदा. - **रताः - रताहा**
- **'इ', 'ई', 'ऐ'** असल्यास त्याचे उच्चारण **'हि'** असे होईल. उदा. - **मतिः - मतिहि, धर्मैः - धर्मैहि**
- **'उ', 'ऊ', 'औ'** असल्यास त्याचे उच्चारण **'हु'** असे होईल. उदा. - **कुरुः - कुरुहु, गौः - गौहु**
- **'ए'** असल्यास त्याचे उच्चारण **'हे'** असे होईल. उदा. - **भूमेः - भूमेहे**
- **'ओ'** असल्यास त्याचे उच्चारण **'हो'** असे होईल. उदा. - **मानापमानयोः - मानापमानयोहो**

## नियम २ : काही विशिष्ट वर्णांच्या आधी येणाऱ्या विसर्गाचे उच्चारण

दोन पदांच्या मध्ये येणाऱ्या विसर्गाचे उच्चारण त्याच्या पुढील वर्णानुसार होते-

- जर विसर्गानंतर **'क'** किंवा **'ख'** हे वर्ण आले तर त्या विसर्गाचा उच्चार काहिसा **'ख्'** सारखा होतो. लक्षात घ्या की उच्चार **'ख्' सारखा** असावा, **प्रत्यक्ष 'ख्' नाही.** जसे - **मैत्रः करुण एव च – मैत्रः(ख्) करुण एव च**
- जर विसर्गानंतर **'प्'** किंवा **'फ्'** वर्ण आले तर त्या विसर्गाचा उच्चार काहीसा **'फ्' सारखा** होतो. (**प्रत्यक्ष 'फ' नाही**). जसे - **ततः पदं तत्परिमार्गितव्यम् – ततः(फ्) पदं तत्परिमार्गितव्यम्**
- विसर्गानंतर **'स्', 'श्'** किंवा **'ष्'** वर्ण असल्यास त्याचा उच्चार क्रमशः **'स्', 'श्' आणि 'ष्'** होतो.

  उदाहरण - **यो मद्भक्तः स मे प्रियः = यो मद्भक्तस्स मे प्रियः**

  **ऊर्ध्वमूलमधः शाखम् = ऊर्ध्वमूलमधश्शाखम्**

  **मनः षष्ठानीन्द्रियाणि = मनष्षष्ठानीन्द्रियाणि**

**विशेष नियम :** विसर्गानंतर **'क्ष'** वर्ण आल्यास त्याचे उच्चारण १ल्या नियमानुसार **ह, हि, हु, हे** असेल.

उदाहरण - **तेजः क्षमा = तेजह क्षमा**

## विसर्ग संधी नियम

संधी करते वेळी भगवद्गीतेमध्ये अनेक ठिकाणी विसर्गाचे परिवर्तन र्, स्, श्, ष् इत्यादीं मध्ये होताना दिसते. हे परिवर्तन विसर्ग संधीच्या नियमांमुळे होते. ते खूप विस्तृत असल्यामुळे ते आपल्याला पुढील स्तरांमध्ये समजावले जाईल; आता आपण पीडीएफ मध्ये जिथे जसे परिवर्तन दिले आहे त्यांचा तसाच अभ्यास करावा.

उदाहरण - **बुद्धिः यो – बुद्धिर्यो, परयोपेताः ते – परयोपेतास्ते, वेदैः च – वेदैश्च**

**लक्षात घ्यावे की विसर्गानंतर वरील वर्णांच्या व्यतिरिक्त कोणताही वर्ण आल्यावर विसर्गाचे उच्चारण नियम १ प्रमाणे ह, हि, हु, हे इत्यादी होईल.**

## अवग्रह(ऽ) –

अवग्रह 'ऽ' हे चिन्ह संधीमुळे झालेला अकाराचा लोप दर्शविते. वस्तुतः ह्याचे कोणतेही विशेष उच्चारण नसते, केवळ विग्रहाच्या वेळी अर्थभेद होऊ नये म्हणून ह्याचा वापर केला जातो।

जसे - **प्रयाणकाले+अपि - प्रयाणकालेऽपि**

## आघात उच्चारणाचे नियम -

- कुठेही **जोडाक्षर** (दोन व्यंजनांचा संयोग) असल्यास त्याच्या आधी येणाऱ्या स्वरावर आघात द्यावा (जोर द्यावा). अर्थात् जोडाक्षराच्या पहिल्या वर्णाचे **द्वित्व** (दोनवेळा उच्चार) करावे. जिथे आघात यायला हवा तिथे खूण म्हणून प्रत्येक श्लोकामध्ये वर्णांच्या वरती '||' चिन्ह दिले गेले आहे.

  उदा. : **क्ष(क्+ष), त्र(त्+र), ज्ञ(ज्+ञ), त्य(त्+य ), व्य(व् +य)** इत्यादी संयुक्त वर्ण आहेत.

  उदाहरण - **मव्यक्तम् = मव् + व्यक् + क्तम्** **मे प्रियः = मेप् + प्रियः**

- जिथे व्यंजना बरोबर स्वराचा संयोग होतो ते जोडाक्षर मानले जात नाही म्हणून तिथे आघातही येत नाही.

  उदाहरण – 'ऋ' हा एक स्वर आहे तर **"विसृजाम्यहम्"** मध्ये 'सृ'='स्+ऋ' ह्यात 'सृ' च्यापूर्वी येणाऱ्या 'वि' वर आघात येणार नाही.

- जोडाक्षराच्या आधी येणाऱ्या स्वरावर आघात असतो. व्यंजनावर किंवा अनुस्वारावर नाही.

  उदाहरण - **वासुदेवं(वँ) व्रजप्रियम्** - ह्यात 'व्र' जोडाक्षर असूनही तत्पूर्वी अनुस्वार असल्याने त्यावर आघात येणार नाही.

- काही ठिकाणी स्वरानंतर संयुक्त अक्षर असले तरी अपवाद नियमामुळे आघात दिला जात नाही, जसे की:

  1. एकच संयुक्त अक्षर दोन वेळा आल्यास : मय्यावेश्य मधे म वर, उत्तिष्ठ मधे उ वर आघात येणार नाही.

  2. तीन संयुक्त अक्षर सोबत आल्यास : भक्त्या मधे भ वर, येन्द्रिय मधे ये वर आघात येणार नाही.

  3. हकार आणि रफाराच्या आधीच्या अक्षरावर आघात येणार नाही. जसे सर्वत्र मधे स वर, गुह्य मधे गु वर आघात येणार नाही.

संस्कृत भाषेमध्ये वर्णांच्या उच्चारणासाठी मुखाच्या विभिन्न स्थानांचा उपयोग केला जातो. ह्या चित्रामध्ये वर्णांच्या उच्चारण स्थानांना दर्शविले आहे. ह्या स्थानांचा उपयोग करून आपण आपल्या उच्चारणांला जास्तीत जास्त शुद्ध करू शकतो. संस्कृत भाषा किती वैज्ञानिक आणि समृद्ध भाषा आहे हे आपण खाली दिलेल्या चित्रामधून जाणू शकतो.




॥ इति ॥